# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/12/2022 (गुरूवार) सायंकाळ

---

### घरफोडी

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत ०६ ते ०८ कि. मी. अंतरावरील मौजा पांडे ले आउट नविन नांदा येथे दिनांक ०६/१२/२०२२ चे १२.०० वा. ते दिनांक ०७/१२/२०२२ चे ०७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. आशा आनंद पाटील, वय ५२ वर्ष, रा. प्लॉट नं. ४२, नवैदयम सभागृहाचे मागे हिचा पती हा घटनावेळी व ठिकाणी नमुद घटनास्थळी येथे गेला होता. व त्यास वेळ झाल्याने तो रात्रीला नातेवाईकांकडे थांबला व यातील फिर्यादी ही तिचा भाऊ नामे —रवि सहारे रा. सक्करदरा, नागपूर येथे काही कामानिमित्य गेली व ती सुदधा तिथे थांबली होती. दरम्यान दिनांक ०७.१२.२०२२ रोजी सकाळी ०७.०० वा. फिर्यादीचे घरासमोरील ओम पारसे व आयुश पाटील यांनी फिर्यादीस फोन करून चोरी झाली असल्याबाबत सांगितले. तेव्हा फिर्यादी तिचा भाऊ रवि पारसे याचे सोबत नांदा कोराडी येथील घरी आली असता तेव्हा फिर्यादीस तिचे घराचे मागील दरवाजा उघडा दिसून आला. तेव्हा फिर्यादी ने घरात जावून सामानाची पाहणी केली असता १) एक सोन्याची पोत सोन्याचे मणी व पदक असलेली वजन अंदाजे २५ ग्रॅम किंमती ६२,०००/— रू. (२) सोन्याचे कानातले झुंबर अंदाजे ८ ग्रॅम किंमती अंदाजे २०,००/— रू. (३) ४ नग बादामी सोन्याच्या अंगठया अंदाजे १० ग्रॅम किंमती अंदाजे २५,०००/— रू. (४) चांदीची वाटी अंदाजे ३० ग्रॅम किंमती १५,०००/—रू. (५) चांदीचे पायपट्टी अंदाजे २० ग्रॅम किंमती १०,०००/—रू. (६) कॅनान कंपनीचा कॅमेरा किंमती २,५००/—रू (७) व्हिवो कंपनीचा जुना मोबाईल किंमती २,०००/—रू. असा एकुण किंमती १,३७,०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराच्या मागील दरवाजाचे लॉक तोडून आंत मध्ये प्रवेश करून घरातील कपाट तोडून चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. दिपक कॉक्रेंटवार पोस्टे खापरखेडा मो. नं. ८३२९६६६६७८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर